# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date : 08 June 2023
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक : ०८ जून २०२३ दुपारी १.०० वा.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज द्वैमासिक आर्थिक धोरण जाहीर केलं. यामध्ये रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. व्याज दरातही कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याची माहिती, बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक गेल्या सहा जून पासून मुंबईत सुरू होती. त्यानंतर आज द्वैमासिक आर्थिक धोरण जाहीर करण्यात आलं. आरबीआयनं दोन हजार रुपयांची नोट चलनातून परत घेतल्यानंतर आर्थिक धोरण समितीची झालेली ही पहिलीच बैठक होती.

****

मराठवाड्यातल्या मोठ्या अकरा जल प्रकल्पांची एकूण पाणी पातळी ३८ पूर्णांक ९६ टक्के आहे. जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळातर्फे आज ही माहिती देण्यात आली. मराठवाड्यातल्या सर्वात मोठ्या जायकवाडी धरणाच्या नाथ सागरामध्ये सध्या ३४ पूर्णांक ५६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. निम्न दुधना धरणात २९ पूर्णांक ७६ टक्के, येलदरी धरणात ५७ टक्के, माजलगाव धरणात २३ पूर्णांक २३ टक्के  पाणी साठा आहे. मांजरा धरणात २४ पूर्णांक ३३ टक्के, पैनगंगा धरणात ४७ पूर्णांक १८ टक्के आणि विष्णुपूरी धरणात ५१ पूर्णांक ४९ टक्के पाणीसाठी शिल्लक असल्याचं पाटबंधारे महामंडळानं म्हटलं आहे.

****

अरबी समुद्रात बिपरजॉय चक्रीवादळ आज अजून तीव्र झालं आहे. येत्या तीन दिवसात ते उत्तरकडे सरकणार आहे. आज पूर्व आणि मध्य अरबी समुद्रात १३० ते १५५ किलोमीटर प्रती तास वेगानं वारे वाहण्याची शक्यता आहे. यामुळं महाराष्ट्रासह कर्नाटक, गोव्याच्या किनारी भागात ३५ ते ४५ किलोमीटर प्रती तास

वेगानं वारे वाहतील. दरम्यान, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उद्यापासून तीन दिवस वादळी वाऱ्यासह मध्यम ते हलका पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

****

भारताविरुद्धच्या कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेतल्या अंतिम सामन्यात आज ऑस्ट्रेलिया तीन बाद ३२७ धावांवरुन पुढं खेळण्यास सुरुवात करेल. ट्रॅव्हीस हेड १४६ धावांवर आणि स्टीव्ह स्मीथ ९५ धावांवर खेळत असून त्यांनी २५१ धावांची भागीदारी केली आहे. लंडनच्या ओव्हल मैदानावर सुरू या सामन्यात काल पहिल्या दिवशी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज आणि शार्दुल ठाकूर यांनी प्रत्येकी एक गडी बाद करत ऑस्ट्रेलिया संघाची अवस्था तीन बाद ७६ अशी केली होती.

****

नाशिक- मुंबई आग्रा रोडवर कसारा घाटाजवळ आज पहाटे झालेल्या अपघातात दोन जैन साध्वींचा मृत्यू झाला आहे. सिद्धायिका श्रीजी आणि हर्षायिका श्रीजी अशी त्यांची नावं आहेत. या दोन्ही साध्वी नाशिक शहरातल्या जैन स्थानकात येत्या दोन जुलैपासून होणाऱ्या कार्यक्रमासाठी मुंबईहून पायी येत होत्या. त्यांना आज पहाटे कासारा घाटाजवळ कंटेनरनं धडक दिल्यामुळं त्यांचा मृत्यू झाला.

****

औरंगाबाद रेल्वे स्थानाकाच्या दोन क्रमांकाच्या फलाटावर आज सकाळी अपघात झाला. यामध्ये काजीपेठ जलद रेल्वे सुटल्यानंतर ती पकडण्याचा प्रयत्न करणारा युवक रेल्वेतून खाली पडल्यानं गंभीर जखमी झाला. प्रवाशांच्या मदतीनं या युवकाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलं आहे.

****

औरंगाबाद शहरातल्या दुधडेअरी चौक आणि आकाशवाणी चौकातली वाहतूक आजपासून चौतर्फा सुरू करण्यात आली आहे. या चौकांमध्ये काही दिवसांपासून एकेरी वाहतूक सुरू होती. पोलिस उपायुक्त अपर्णा गित्ते यांच्या उपस्थितीमध्ये या चौकातल्या वाहतुकीला खुलं करण्यात आलं.

****

दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या पहिल्या इंग्रजी भाषेतल्या वृत्तनिवेदक गीतांजली अय्यर यांच्या निधनाबद्दल माहिती प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकुर यांनी शोक व्यक्त केला आहे. अय्यर यांनी बातम्यांमध्ये विश्वासार्हता सोबतच एका विशिष्ट आवाजानं पत्रकारीता आणि प्रसारण जगतात एक विशिष्ट ओळख बनवली होती असं मंत्री ठाकूर यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. अय्यर यांचं काल नवी दिल्लीत निधन झालं, त्या ७६ वर्षांच्या होत्या.

****

नंदुरबार जिल्ह्यात बोगस बियाणांच्या खरेदी विक्री विरोधात शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते धरणे आंदोलन करत आहेत. जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयासमोर हे आंदोलन सुरू आहे. गुजरात राज्यातून मोठ्या प्रमाणात बोगस बियाणं आणि खतं आणली जात असल्याचा आरोप आंदोलक करत आहेत.

//*************//